# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

## नोटीस

## ( पुरवणी विषय पत्रिका )

नागपूर महानगरपालिकेची गुरुवार दिनांक 20/06/2019 रोजी सकाळी 11–00 वाजता श्रीमंत राजे रघोजीराव भोसले, नगरभवन, महाल येथे भरणाऱ्या सर्वसाधारण सभेकरिता मा. सदस्यांनी दिलेल्या नोटीस विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

आदेशान्वये,

नागपूर
दिनांकः– 18/06/2019

हस्ता/–

( हरीश नवलकिशोर दुबे )
निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

विषय क्रमांक 331 (नोटीस) : –
(पेंच प्रकल्प )
(मा. ॲड. धर्मपाल मेश्राम)

हंजर बायोटेक एनर्जीज प्रा. लिमी. कंपनीने मनपाची फसवणूक करुन आज तारखेपर्यंत 18,89,85,007/– (अठरा करोड एकोणनव्वद लाख पंच्यांशी हजार सात रु.. फक्त) रु. ची खोटी देयके उचलली व पूर्व परवानगी शिवाय संपूर्ण मशीनरी परस्पर विक्री केली, एवढेच नव्हे तर संपूर्ण कवाडची देखील विक्री केली.

निव्ळ हया महानगरपालिकेलाच हवा कंपनीच्या संचालकांनी फसविले नाही, तर देशभरातल्या अने महानगरपालिकेच्या रकमेवर दरोडा घातला. हया कंपनीच्या संचालकाचे लागेबांधे विदेशी भूमीपर्यंत पोचलेले असून,, हया कंपनी संचालकांची व त्यांच्या आर्थिक व्यवहारांचाही पोलीस चौकशी करणे संबंधी सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 332 (नोटीस) : –
(विद्युत विभाग)
(मा. श्री. प्रवीण दटके)

नागपूर शहरामध्ये टी.व्ही., केबल कंपन्यामार्फत, इंटरनेट पुरविण्याऱ्या कंपन्यामार्फत तसेच इतर ओव्हरहेड टाकलेले केबल या सर्व कंपन्याना मनपा कायदाच्या अधिन राहून नियमानुसार परवानगी दिली आहे का? परवानगी देण्याची आपल्याकडे नियमावलीची काही व्यवस्था आहे का? आणि आपण याची परवानगी दिली नसल्यास यावर काय कार्यवाही अपेक्षित होती अथवा यानंतर अपेक्षित आहे. या विषयावर सभागृहात चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 333 (नोटीस) : –
(वित्त विभाग)
(मा. श्री. तानाजी वनवे)

नागपूर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना व शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीची रक्कम देण्याबाबत तसेच सातव्या वेतन आयोग लागू करण्याच्या संदर्भाने या विषयावर सभागृहात चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

............2/–(मागे पहा)

विषय क्रमांक 334 (नोटीस) : —
(आस्थापना विभाग)
(मा. श्री. प्रवीण दटके)

आस्थापना विभाग अंतर्गत येणाऱ्या संपूर्ण विभागातील कर्मचाऱ्यांना वेळोवेळी देण्यात येणाऱ्या पदोन्नतीसाठी लागणारा जास्तीचा वेळ व डी.पी. सी. च्या बैठकीचे अनियमित वेळापत्रक व अन्याय या मुद्यांवर सभागृहात चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस

टिप :— मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

—————————